## निशाणी क्र. १७७ वरील आदेश

१. वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज त्यांचेविरुध्द झालेला "उलटतपास नाही" चा आदेश रद्दबातल होवून मिळण्यासाठी केला आहे.

२. वादीच्या अर्जामधील कथन असे की, सदरकामी मागील तारखेस नि. १६० व १६१ ला "उलटतपास नाही" असा आदेश वादीचे विरुध्द झालेला आहे. वादी हे मुंबई येथे वास्तव्यास असलेने व पाऊस मोठ्या प्रमाणात असलेने मागील तारखेस मे. कोर्टात हजर राहु शकले नाहीत, तसेच यातील माहितगार वकील श्री. जे.एम.महामुनी हे मागील तारखेस दवाखान्याचे कामानिमित्त अचानक परगावी गेलेने मे. कोर्टात हजर राहुन उलटतपास घेता आला नाही. त्यामुळे सदर वादीचे विरुध्द "उलटतपास नाही" असा आदेश झालेला आहे. वादीचे विरुध्द झालेला उलटतपास नाही आदेश रद्द न झालेस वादीचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. याउलट प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. तसेच सदरचा दावा पारदर्शक चालणेस मे. कोर्टास मदत होणार आहे. तरी सदरकामी वादीचे विरुध्द झालेला "उलटतपास नाही" असा आदेश न्यायाचे दृष्टीने रद्द होउन मिळावा अशी विनंती केली.

३. सदर अर्जास प्रतिवादींच्या विधीज्ञांनी आपले म्हणणे दाखल करुन विरोध दर्शविला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार वादी यांचा अर्ज व त्यामधील संपुर्ण मजकुर खोटा व लबाडीचा आहे. मे. वरिष्ठ न्यायालयाने वादी यास संधी दिली होती. या मे. कोर्टानी वादीचा पुरावा अनेकवेळा बंद केला होता. मात्र वादी असे असुन उलटतपास

घेत नाही. यावरुन वादी यांचा अप्रामाणिकपणा दिसुन येतो. सबब वादी यांचा अर्ज नामंजुर करणेत यावा अशी विनंती केली.

**४.** अर्ज व म्हणणे वाचले. वादी व प्रतिवादींच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

**५.** दाव्याचे रेकॉर्ड तपासले असता याकामी सदर दाव्याचे कामी नि.१६० वर वादीतर्फे साक्षीदार शंकर आप्पा मोटे यांचा सरतपास दिला असुन नि.१६१ वर वादीतर्फे महादेव आबा मोटे यांचा सरतपास आहे. दि.०६/०७/२०२३ रोजी नि.१६० वर तसेच नि.१६१ वर दि.०६/०७/२०२३ रोजी नि.१६० व नि. १६१ वर त्यांचेविरूध्द "उलटतपास नाही" चा आदेश पारीत करण्यात आला. वादीच्या विधीज्ञांनी साक्षीदारांचा उलटतपास घेण्याकरीता दि.०६/०७/२०२३ रोजीची तारीख त्यांच्या सहमतीने घेतली होती. परंतु वारंवार पुकारा करुनही वादी व त्यांचे विधीज्ञ यांचा पुकारा केला असता ते गैरहजर राहीले. त्यामुळे त्यांचेविरुध्द नि.१६० व १६१ ला उलटतपास नाही असा आदेश पारित करण्यात आला होता. वादीचे माहितगार वकील श्री. जे.एम.महामुनी हे अचानक दवाखान्यात गेले होते असे कथन केले आहे परंतु त्याबाबतचा कोणताही पुरावा त्यांनी अभिलेखावर दाखल केलेला नाही. सदरचा दावा हा वाटपासाठीचा असुन सदरचा दावा गुणदोषावर निकाली काढण्याकरीता प्रतिवादी यांची उलटतपासणी आवश्यक आहे. त्यामुळे वादी यांना न्यायाच्या दृष्टीने एक संधी देणे योग्य होईल. झालेला विलंब हा दंडाच्या स्वरुपात भरुन काढता येऊ शकेल. सबब खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

## आदेश

१. वादी यांचा अर्ज र.रु.२०००/– च्या खर्चावर मंजूर करणेत येतो.

२. वादी यांनी वरील खर्च रु. २०००/– पैकी प्रतिवादी तर्फे साक्षीदार यांना प्रत्येकी १०००/– रुपये पुढील तारखेदिवशी अगर तारखेपूर्वी देणेचा आहे. या अटीची पूर्तता न झालेस वादीविरुध्द योग्य ते आदेश पारीत होतील.

३. पुढील तारखेस वादीच्या विधीज्ञांनी साक्षीदाराचा उलटतपास न चुकता घ्यावा.

४. प्रतिवादी यांनी पुढील तारखेस त्यांचे साक्षीदार हजर ठेवावेत.

ANANT RADHAKISHAN TENGSE
Digitally signed by ANANT RADHAKISHAN TENGSE
Date: 2023.08.17 16:40:21 +0530

आटपाडी. **( अनंत रा. टेंगसे )**

दि. १७/०८/२०२३ सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, आटपाडी.

# CERTIFICATE

I affirm that, the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | A. A. Jamadar |
| Court | : | Jt.C.J.J.D. & J.M.F.C., Atpadi. |
| Judgment/Order signed by the Presiding Officer on | : | 17/08/2023 |
| Judgment/Order uploaded on | : | 17/08/2023 |